# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**
**दूरध्वाीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**
ई-मेलः **mercindia@mercindia.org.in**
वेब-साईट- www.mercindia.org.in

**प्रसिध्दी-पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) त्यांच्या विद्युत ग्राहकांना ' वीज पुरवठ्याकरिता अटी आणि संकीर्ण आकार ' यानुसार विविध सेवांकरिता वेगवेगळे आकार आकारीत आहे. हे आकार एप्रिल, १९९८ पासून अंमलात आहेत.

२. विद्युत अधिनियम, २००३ मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने लागू केलेल्या विद्युत पुरवठा संहिता विनियम, २००५ मधील तरतूदीनुसार सेवा आकारांच्या अनुसूचीला आयोगाची मान्यता आवश्यक आहे. त्यानुसार बेस्टने आयोगाकडे प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करुन सर्व संबंधितांकडून प्रस्तावावर सूचना व अभिप्राय मागविण्यात आले होते. दिनांक २१ सप्टेंबर, २००६ रोजी या संदर्भात जाहीर सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत तसेच आयोगाकडे थेट प्राप्त झालेले सूचना व अभिप्राय विचारात घेऊन सुधारित सेवा आकारांच्या अनुसूचीला आयोगाने दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ च्या आदेशांन्वये मान्यता दिली आहे.

३. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत-

१) विद्युत जोडणी मंजूर करताना याबबतची कार्यपध्दती सोपी व सुटसुटीत करण्यासाठी आयोगाने मोजमापावर आधारित बदलते आकार रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या ऐवजी आयोगाने प्रमाणानुसार सेवा कमिशन आकार लावण्यास मान्यता दिली आहे.

२) तात्पुरती वीज जोडणी देण्यासाठी बेस्टने प्रस्तावित केलेले आकार आयोगाने फेटाळले असून त्या ऐवजी तात्पुरत्या वीज पुरवठ्यासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आकारण्यास आयोगाने बेस्टला निदेश दिले आहेत.

३) विद्युत पुरवठा तोडण्यासाठी व पुनर्जोडणीसाठी प्रत्यक्ष झालेला खर्च वसूल करण्यास बेस्टला परवानगी देण्यात आली आहे.

४) मीटरचे सध्याचे ठिकाण त्याच जागेत बदलावयाचे असल्यास त्यासाठी जर ग्राहकाने विनंती केली असेल तरच बेस्टला आकार लावता येतील. तथापि, जेव्हा बेस्टला मीटरच्या ठिकाणात असा बदल स्वतःहून करावयाचा असेल तेव्हा येणारा सर्व खर्च बेस्टला करावा लागेल.

५) ग्राहकाच्या विनंतीवरुन विद्युत मांडणीची तपासणी केल्यास त्यासाठी बेस्टने प्रस्तावित केलेल्या आकारांना आयोगाने मान्यता दिली आहे. मात्र, तपासणी अहवालाची एक प्रत बेस्टने संबधीत ग्राहकाला दिली पाहिजे.

६) मीटरच्या अचूकतेची तपासणी करण्याची विनंती जर ग्राहकाने बेस्टला केली असेल तर अशा तपासणीच्या आकरासंबंधीचा बेस्टचा प्रस्ताव आयोगाने मान्य केला आहे. चाचणी केल्यानंतर जर मीटर अचूकतेच्या मर्यादेपलीकडे असल्याचे आढळून आले तर ग्राहकाला आकारलेला तपासणी आकार बेस्ट ग्राहकाला परत करेल व देयकाची रक्कम चाचणीच्या निष्कर्षानुसार समायोजित करेल.

७) हरवलेली किंवा जळालेली मीटर बदलण्यासाठी लावावयाद्च्या बदली मीटर्सची किंमत वाजवी असल्याचे सिध्द करण्यासाठी समर्थनार्थ कोणतीही कागद पत्रे बेस्टने सादर केलेली नाहीत. त्यामुळे, अशा हरवलेल्या किंवा जळालेल्या मीटरच्या बाबतीत

किंवा मीटर जर ग्राहकाने खरेदी केले असेल तर, स्टॅटिक मीटरच्या बाजारातील किंमतीवर आधारित दरांना आयोगाने मंजूरी दिली आहे.

८) अग्निशमन सेवांसारख्या अनियममित सेवांसाठी, सेवा वाहिनीच्या लांबीच्या प्रति मीटरकरिता अ) स्थिर प्रमाणानुसारी आकार आणि ब) बदलते आकार, असे दोन भागात आकार लावण्याचे बेस्टने प्रस्तावित केले आहे. ग्राहकाच्या दृष्टीने, अग्नि-शमन सेवेचा वापर ही एक स्वतंत्र वितरण सुविधा आहे. यामुळे, अग्निशमन सेवेसाठी दोन भागात आकार लावण्याचा बेस्टचा प्रस्ताव आयोगाने फेटाळला असून अग्निशमन सेवा जोडणी देण्यासाठी प्रत्यक्ष झालेला खर्च आकारण्यास आयोगाने बेस्टला निदेश दिले आहेत.

९) वीज पुरवठ्यासाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावरील कार्यवाहीसाठी नाममात्र रक्क्म आकारण्यास बेस्टला आयोगाने परवानगी दिली आहे

४. बेस्टने प्रस्तावित केलेले सेवा आकार आणि आयोगाने मान्यता दिलेले सेवा आकार यासंबंधीचा तपशील जोडपत्र-१, २ व ३ मध्ये देण्यात आला आहे.

५. सुधारित सेवा आकार दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात येतील.

६. आयोगाने पारित केलेला दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ चा आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

सही/-

सचिव .

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,

दिनांक १२ ऑक्टोबर, २००६

| | | | |
|---|---|---|---|
| | | **Annexure - 1** | |
| **SCHEDULE OF RATES** | | | |
| **Application Registration & Processing Charges** | | | |
| **Sr. No.** | **Particulars** | **Proposed by BEST (Rs.)** | **Approved by MERC (Rs.) **** |
| 1 | New connections/ Reduction or addition of Load/ Shifting of service/ Extension of service/ Restoration of Supply/ Temporary connection | | |
| | a) Single phase | 100 | 25 |
| | b) Three phase | 100 | 50 |
| | c) HT supply | 100 | 100 |
| | Change of name | | |
| 2 | a) Single phase | 50 | 25 |
| | b) Three phase | 50 | 50 |
| | c) HT supply | 50 | 50 |

** - As per Commission's Order dated ------ (Case No. 26 of 2006).

<table>
<tr><td colspan="4" align="right">Annexure-2</td></tr>
<tr><td colspan="4" align="center">SCHEDULE OF RATES</td></tr>
<tr><td colspan="4" align="center">Service Connection Charges for New Connection and Extension of Load</td></tr>
<tr><td>Sr. No.</td><td>BEST’s Proposal</td><td colspan="2">As approved by MERC *</td></tr>
<tr><td></td><td rowspan="13">i) Connection Fee for new connection – Rs. 50/- per connection<br>plus<br>ii) Normative charge of Rs. 450/- per kW<br>plus<br>iii) Variable charge of Rs. 1150/- per metre for service length exceeding 100 metres</td><td>Category</td><td>Service Connection charges in (Rs.)</td></tr>
<tr><td>1</td><td>L.T. Supply</td><td></td></tr>
<tr><td rowspan="8"></td><td>Single Phase</td><td></td></tr>
<tr><td>For loads upto 5 kW</td><td>1500</td></tr>
<tr><td>Loads above 5 kW and upto 10 kW</td><td>2500</td></tr>
<tr><td>Three Phase</td><td></td></tr>
<tr><td>Motive power upto 27 HP or other loads upto 20 kW</td><td>6000</td></tr>
<tr><td>Motive power above 27 HP but upto 67 HP or other loads above 20 kW but upto 50 kW</td><td>13000</td></tr>
<tr><td>Motive power above 67 HP but upto 134 HP or other loads above 50 kW but upto 100 kW</td><td>27000</td></tr>
<tr><td>Motive power above 134 HP but upto 201 HP or other loads above 100 kW but upto 150 kW</td><td>45000</td></tr>
<tr><td>2</td><td>H.T. Supply</td><td></td></tr>
<tr><td rowspan="2"></td><td>For loads upto 500 kVA</td><td>275000</td></tr>
<tr><td>Loads above 500 kVA</td><td>300000</td></tr>
</table>

* - As per Commission's Order dated ------ (Case No. 26 of 2006).

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **Annexure-3** |
| **SCHEDULE OF RATES** | | | |
| **Miscellaneous and General Charges** | | | |
| **Sr. No.** | **Particulars** | **Proposed by BEST (Rs.)** | **Approved by MERC (Rs.) **** |
| 1 | **Reconnection charges** | | |
| | L.T. Service at cut-outs - | | |
| | a) where meter is not removed | | |
| | Single phase | 50 | 25 |
| | Three phase | 50 | 50 |
| | b) where meter is removed | | |
| | Single phase | 200 | 50 |
| | Three phase | 200 | 100 |
| | At underground mains | 1000 | 200 |
| | H.T. Supply | 200 * | 200 |
| | | | |
| 2 | **Changing the position of meter at consumer's request** | 50 | 50 |
| 3 | **Testing of Installation on consumer's request** | 50 | 50 |
| 4 | **Testing of meters at BEST's laboratory** | | |
| | Single phase | 100 | 100 |
| | Three phase | 300 | 300 |
| 5 | **Cost of meter (applicable in case consumer opts to purchase the meter from BEST & in case of Lost and Burnt meter)** | | |
| | Single phase Meter | 1373 | 700 |
| | Three phase whole current Meter | 11396 | 3000 |
| | Three phase CT operated Meter | 16080 | 5500 |
| | H.T. TOD Meter | - | 5500 |

* - As per BEST's response letter dated 4th October 2006.

** - As per Commission's Order dated ------ (Case No. 26 of 2006).